छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय रुकडी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# प्रकल्प शिर्षक :- D 2 समाजाभिमुख प्रकल्प

## D-2 Project Related to Community Experience

प्रात्यक्षिक

समाजाभिमुख प्रकल्पातंर्गत

विविध संस्थांना भेटी

संस्था : १) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - शिवतलाव, बोटॅनिकल गार्डन, शिक्षणशास्त्र विभाग


विशेष संस्था : २) चेतना विकास मंदिर, शेंडापार्क, कोल्हापूर


संस्था : ३) वस्तू संग्रहालय, टाऊन हॉल, कोल्हापूर


४) महाविदयालयातील न्युज लेटर (बातमीपत्र) चालवणे पारिजात त्रैमासिक अंक

**२०२५-२०२६ दिनांक ११/०२/२०२६**

**नाविण्यपुर्ण शैक्षणिक संस्थांना भेटीसाठी महाविद्यालयाने केलेले पत्रव्यवहार फोटो**







प्राचार्य
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रूकडी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner




॥sa vidya ya vimuktye॥

Late Balasaheb Mane Education Trust, Rukadi

Sanchalit

Chh.Shivaji College of Education, Rukadi



# COMMUNITY ENGAGEMENT PROGRAM

## IQAC UNDER

## Project Related to Community Experience: visit to Special Institute

11 February 2026

This is to Certify that................................................................................
of Class B.Ed. II yr / IV Sem. Subject - D 2 : Project related to Visit to Special Institute and Musiem He / She was worked as Project Participant as a Student - Teacher in the Community Engagement Program.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Chatana Vikas Mandir Kolhapur | Town Hall Musiem, Kolhapur | Education Department, Shivaji University, Kolhapur | Late Shri.Hanmantrao Alias B.G.Kharade College of Education, Kolhapur | Principal, Chh.Shivaji College of Education, Rukadi |

प्रकल्पांची उद्दिष्टये -

| शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार समाजाभिमुख प्रकल्पाची उद्दिष्टये | समाजाभिमुख प्रकल्पाची उद्दिष्टये |
|---|---|
| १)समाज ही संकल्पना समजण्यास मदत करणे. | १) स्थानिक समस्या सोडविणे. |
| २)विविध सामाजिक स्तरावरील मुलासंबंधी समस्या समजण्यास मदत करणे. | २) साक्षरता वाढविणे. |
| ३)सामाजिक व समायोजन कौशल्य विकसित करणे. | ३)आरोग्य विषयक जागरुकता निर्माण करणे. |
| ४)समाजाच्या विविध समस्यांवर उपयोजनाबाबत विचार करण्याची वृत्ती निर्माण करणे. | ४) शाश्वत विकास साधणे. |
| ५)समाजाच्या सामाजिक व वैयक्तिक समस्या समजण्यास मदत करणे. | ५)शहरी विकासाच्या माध्यमातून शहरी विकास साधणे. |
| ६)सामाजिक बांधिलकी निर्माण करणे. | ६)ग्रामीण विकासाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधणे. |
| ७)राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावणे. | |

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

समाजाभिमुख प्रकल्प अभ्यासाचे हेतू :-

१) कृतीद्वारे शिक्षण - केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता विदयार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळते अनुभवातून शिक्षण मिळते.

२)स्वयंअध्ययन आणि आत्माविश्वास वाढीस लागतो विदयार्थी प्रकल्पामधून स्वत: माहिती मिळवतो संकलित करतो विश्लेषण करतो त्यामुळे आत्मविश्वास वाढतो.

३)सृजनशीलतेस चालना - या प्रकल्पामधून कल्पकता चिकित्सक विचार वाढण्यास मदत होते.

४)संघभावना व सहकार्य - प्रकल्पातून गटात केलेल्या कामामध्ये विदयार्थी जेव्हा एकमेकांना सहकार्य करतात त्यातून सांघिक भावना व जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

५)वास्तविक जिवनाशी सहसंबंध - या प्रकारच्या प्रकल्पामुळे पुस्तकी ज्ञानाचा व्यावहारिक जीवनात कशा प्रकारे वापर केला पाहिजे हे समजते.

६)वेळेचे नियोजन - प्रकल्प वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने वक्तशीरपणा वेळेचे नियोजन याचेही महत्व समजते.

७)संशोधन वृत्ती - प्रकल्पातंर्गत कोणत्याही विषयावर सखोल माहिती गोळा केल्यामुळे विदयार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होते.

Scanned with OKEN Scanner

समाजाभिमुख प्रकल्प अभ्यासाचे महत्व :-

१)समाजाभिमुख प्रकल्पातून विविध शैक्षणिक संस्था व या शैक्षणिक संस्थांची समाजासाठी केलेली कार्य व योगदान यांची माहिती मिळते.

२)गटकार्य केल्याने सांघिक व सहकार्यांची वृत्ती वाढण्यास मदत होते.

३)समाजभिमुख प्रकल्पामुळे सामाजिक घडणाची जाणीव होते यास मदत होते.

४)समाज आणि शाळा यामधील अंतर कमी होण्यास तसेच शालेय वातारणामध्ये सामाजिक वातावरण रुजण्यास या उपक्रमामुळे मदत होते.

५) सामाजाभिमुख प्रकल्पातून समाजात राहून आपली जबाबदारी कशी पुर्ण करावी/ केली पाहिजे याची जाणीव निर्माण होण्यास मदत होते.

६)विदयार्थ्यांला समाजशील, समाजाभिमुख बनवायचे असेल तर या समाजाभिमुख विविध उपक्रमांमधून समाज तेथील वातावरण समजण्यास, अनुभवण्यास, व्यावहारिक ज्ञान मिळण्यास मदत होते.

७)अशा उपक्रमांमधून विदयार्थ्यांमध्ये एकोपा, एकनिष्ठता जबाबदारी शिक्षणाचे मुल्य व ते अंगिकारणेस मदत होते.

८)समाजाभिमुख प्रकल्पाचे खरे महत्व म्हणजे जे विदयार्थी कमजोर, वंचित व ज्यांना गरज आहे त्या सर्वांना शिक्षणातून सशक्त करुन जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोण बदलण्यास या शैक्षणिक संस्थामधून पहावयास मिळते.

९)समाजपरिवर्तनासाठी अशा शैक्षणिक संस्थाचा अभ्यास केल्याने समाजाविषयीची नैतिकता हा गुण वाढीस लागतो.

कार्यपध्दती : प्रत्यक्ष कार्य - भेट वृत्तांत लिहावा.

Scanned with OKEN Scanner

## शैक्षणिक अहवाल

**१२/०२/२०२६**

D-**2** समाजाभिमूख प्रकल्पातंर्गत व D-**3** नाविण्यपूर्ण अध्ययन अध्यापन केद्रांना भेटी तसेच Course no-**9** सर्वसमावेशक शाळा मधील Sessional work या प्रात्यक्षिकांतर्गत छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविदयालय महाविदयालयाने दिनांक ११/०२/२०२६ रोजी शिवाजी विद्यापीठ (शिवतलाव व बॉटेनिकल गार्डन भेट) चेतना विद्यामंदिर शेंडापार्क शिक्षणशास्त्र विभाग टॉऊन हॉल वस्तू संग्रहालय व खराडे शिक्षणशास्त्र महाविदयालय कोल्हापूर, या विविध शैक्षणिक संस्थाना दिलेल्या भेटीचा अहवाल पुढीलप्रमाणे


समाजाभिमुख प्रकल्प हे प्रामुख्याने समाजाच्या उन्नतीसाठी, दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी आणि सामाजिक समस्या सोडविण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम आहेत. हे प्रकल्प स्थानिक स्तरावर, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, वंचित घटक किंवा पायाभूत सुविधामध्ये सुधारणा करण्यासाठी कल्याणाकारी राज्यसंस्था किंवा विविध संस्थांद्वारे राबविले जातात.

### समाजाभिमुख प्रकल्पाची उदाहरणे

१)शालेय किंवा महाविदयालयीन स्तरावर आयोजित पथनाटय




२)स्वच्छता मोहिम









Scanned with OKEN Scanner

छ. शियाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ता हातकणंगले, जि. कोल्हापूर

३)वृक्षारोपण



४) ग्रामीण विकास प्रकल्प





पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा प्रकल्प

सौर ऊर्जा प्रकल्प

सौर ऊर्जा - एक काळाची गरज

प्रस्तावना :-

सौर ऊर्जा ही एक अशी ऊर्जा आहे, जी अनंत आहे आणि प्रदूषणमुक्त आहे. जगभरातील अनेक देश आता सौर ऊर्जेचा वापर करून त्यांची ऊर्जा गरजा भागवत आहेत. भारतातील हवामान सौर





**प्रकल्पांचे विविध प्रकार**


१)आरोग्य आणि स्वच्छता - ग्रामीण भागात आरोग्य शिबीरे आयोजित करणे आणि सारख्या संस्थांच्या मदतीने सार्वजनिक शौचालये बांधणे.



२)पर्यावरण संवर्धन - शाळा, रस्ते आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे.



३)कल्याणकारी उपक्रम - ज्येष्ठ नागरिकांसाठी हेल्पएज इंडिया किंवा मुलाच्या शिक्षणासाठी प्रथम यासारख्या संस्थांद्वारे राबवले जाणारे प्रकल्प




**फायदे -**

समाजाभिमुख प्रकल्पामुळे समाजातील समस्येबद्दल संवेदनशीलता वाढते आणि शाश्वत बदल घडवून आणण्यास मदत होते.

दिनांक ११/०२/२०२६ रोजी महाविदयालयाने सर्वप्रथम शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मधील शिवतलावास भेट दिली यामध्ये शिवतलावाची संपूर्ण माहिती तसेच या तलावातील झिरपणारे पाणी तेथे असलेल्या विहीरीमध्ये जाते व त्या विहिरीची नाव सुतार विहिर, नवीन सुतार विहिर, शिंदे विहिर २ या विहिरीचे पाणी संपूर्ण शिवाजी विद्यापीठ परिसरासाठी वापरले जाते तसेच या पाण्याची गुणवता दर्जा अतिशय जैविक दृष्टीकोणातून उत्तम आहे. या ठिकाणी विविध प्रकारचे पक्षी आहेत. त्यामध्ये ब्राम्हणी, घार, टिटवी, मोर, लांडोर, बदक, बुलबुल इत्यादी प्रकारचे पक्षी यांचे दर्शन झाले याची माहिती दिली. तसेच या ठिकाणी विविध प्रकारच्या वनस्पती गुलमोहर, शेवरी, नारळ, चिंच, आंबा, कडूनिंब, काटेरी बोर तसेच काटेरी वनस्पती आहेत. या तलावाची रचना या तलावात पाणी ऊमाळयामधून येते. कोरोना काळात या तलावातील पाणी अनेक आसपासच्या भागात पुरवल्याची माहिती तसेच महापूर काळातही अनेक ठिकाणी पाणी पुरवठा केला असे या तलावाचे महत्व सांगितले. तलावाच्या पाण्याने शिवाजी विद्यापीठ स्वयंपूर्ण झाले आहे. अतिशय

रम्य लोभस वातावरणात हा तलाव आहे याच बाजूला अनेक प्रकारची झाडे वनस्पती झुडपे आहेत. शिवतलावाची माहिती घेतली.




बोटॅनिकल गार्डन - भेटीमध्ये विदयार्थ्यांनी अनेक वेगवेगळया वृक्ष, वनस्पती वेली, पॉन्ड, कमळ, धुप, औषधी वनस्पती, झुडुप ऑक्रिड वनस्पती, पाम वनस्पती, दगडफुल, शैवाल अशा अनेक प्रकारच्या वनस्पती वैविधतेने नटलेले हे लायकेन गार्डन वि.साठी खुपच प्रेरणादायी ठरले





व ती माहीती घेऊन आम्ही पुढील शैक्षणिक संस्था चेतना विद्यामंदिर शेंडापार्क या ठिकाणी पोहोचलो.

सर्वप्रथम मुख्याध्यापकांनी सर्वाचे स्वागत केले व नंतर शाळा भेटीचे आयोजन करण्यासाठी दोन गटात विदयार्थी विभागले अगदी प्राथमिक स्तरापासून वरच्या स्तरापर्यंत ही चेतना विदयालयाची मुले विदयार्थी काय काय वस्तू बनवतात ते प्रत्येक विभागात गेल्यानंतर तेथील शिक्षकांनी याची माहिती दिली. आमच्या विदयार्थीनी त्यांच्याशी संपर्क साधला त्यावेळी तेथील प्रत्येक विदयार्थ्यांनी आपली ओळख सांगितली तसेच बनवलेल्या वस्तू दाखवल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा उत्साह दिसत होता. प्रत्येक वस्तू मध्ये नीटनेटकेपणा आणण्यासाठी ते कौशल्य अंगीकृत करण्यासाठी विदयार्थी प्रयत्न करत असतात येथे मातकाम, सुतारकाम, कागदकाम, रांगोळी, हस्तकला, पाककला, तेलघाणा, शिवणकाम इत्यादी विभाग होते. प्रत्येक विभागामध्ये ८ ते १० विदयार्थी होते हे विदयार्थी विविध वयोगटातील होते. एक-दोन विदयार्थी तर ५५ वर्षांचे होते. प्रत्येक विभागामध्ये अतिशय सुंदर, आकर्षक वस्तू तयार केल्या होत्या. या चेतना विदयालयात (शिष्यवृत्ती योजना) जिल्हा परिषद मतदान अधिकार याचे प्रशिक्षण दिले जाते. केअरिंगची सोय आहे. दिशा अभ्यासक्रम राबवला जातो. या संस्थेचा उद्देश आहे त्या स्थितीत त्यांना कौशल्यपूर्ण सक्षम बनवले जाते सहानुभुती नको आर्थिकतेच्या बाजूने भक्कम असूनही त्यांना आधार देण्याचे काम ही संस्था करते अगदी नुसता बसणारा विदयार्थी त्यास मानधन १०० दिले जातात ही मुले आज विविध ठिकाणी कार्यरत आहेत. सर्व विभागांना भेटी दिल्यानंतर या संस्थेचे प्रमुख चेतना सोनकांबळे यांनी बी.एड छात्राध्यांपकांना चेतना विदयामंदिराची संपूर्ण माहिती दिली. यानंतर संतोष कोळी याने आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाच्यावतीने सहा.प्राध्या.एस.एस.गायकवाड यांनी आपले विचार/ मनोगत व्यक्त केले व त्यानंतर आम्ही चेतना विद्या मंदिरमधून निरोप घेतला.

Scanned with OKEN Scanner



त्यानंतर ठीक  ३.१५ वाजता आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाला भेट दिली . शिक्षणशास्त्र विभागातील सर्व तज्ञांनी आपला परिचय करुन दिला. त्याचबरोबर तेथे असलेल्या सर्व विभागांची सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी BSC B.Ed., M.Ed. यांची सविस्तर माहिती दिली. बी.एड छात्रध्यापकांना B.Ed. नंतर पुढे काय करावे याचे सखोल मार्गदर्शन केले. बी.एड करत असतानाच CET,CTET,SET,NET यांची तयारी करा रिसर्च पेपरचे काम करा असा सल्ला दिला यानंतर सर्व छात्रध्यापकांनी तेथील व्याख्यान कक्ष, प्राध्यापक कक्ष, संगणक कक्ष, ग्रंथालय इत्यादींना भेटी दिल्या या नंतर शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चेतना सोनकांबळे यांनी विदयार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. विदयार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यानंतर ग्रुप फोटो काढण्यात आले.




शिक्षणशास्त्र विभागाला भेट दिल्या नंतर सर्व छात्राध्यापकांस प्राध्यापक वृध्दं टाऊन हॉल येथे वस्तू संग्रहालयास  भेट देण्यास गेले. येथे विदयार्थ्यांनी टिकीटे काढून वस्तू संग्रहालयामध्ये प्रवेश केला यामध्ये विविध पुरातन वस्तू पाहिल्या लाकडी कोरीव काम केलेले मंदिर व गणेश मुर्ती विविध देवताच्या पाषाण मुर्ती ताम्र धातूच्या वस्तू मातीची भांडी तलवार ढाल विविध प्रकारचे हंडे कणगी विविध पोशाख चिलखत व विविध प्रकारची चित्रे याचे निरीक्षण केले येथे छायाचित्रे काढण्यास सक्त मनाई होती त्यामुळे सर्व नियमांचे पालन सर्व छात्राध्यापकांनी केले. यानंतर वस्तू संग्रहालयातून बाहेर येऊन ग्रुप फोटो काढला.

Scanned with OKEN Scanner





# पारिजात त्रैमासिक अंकाचा फोटो


पारिजात

डॉ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी.


NAAC PEER TEAM


अहिल्याबाई होळकर

हॉकी सम्राट ध्यानचंद्र

नाग पंचमी


राजर्षी शाहू महाराज जीवन परिचय


लोकमान्य टिळक

साहित्याचा एक महान शिलेदार : लोकशाहिर अण्णाभाऊ साठे

गुणवंत विद्यार्थी २०२३-२०२५

Scanned with OKEN Scanner

**समाजाभिमुख प्रकल्पाचे निष्कर्ष :-**

छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
ता हातकणंगले,
जि. कोल्हापूर

१)शिवाजी विद्यापीठ शिवतलावाचे पाणी शुदध आहे.

२)शिव तलावाजवळ मानवी वावर कमी आहे.

३)जैविक विविधता अबाधित राहण्यासाठी शिवाजी विद्यापीठ जागृत असल्याचे दिसून आले.

४)बौटॅनिकल गार्डन हे खरोखरच वनस्पतीशास्त्राला अनुसरुन असल्याचे प्रकर्षाने जाणवले कारण तिथे अनेक प्रकारच्या वनस्पती झुडपे पाणवनस्पती, पाणतळी दिसून आली.

५)टाऊन हॉल येथील वस्तु संग्रहालयाला भेट देण्याचा उद्देश ऐतिहासिक वास्तु कशा प्रकारे जतन, संवर्धन करुन ठेवलेल्या आहेत. याची जाणीव विद्यार्थ्यांच्यात निर्माण करण्याचा प्रयत्न केला तसेच हा प्रयत्न ते दैनदिन आयुष्य जगत असताना समाजामध्ये वावरत असताना समाजाच्या काही वस्तु असतात शैक्षणिक संस्थेमधील काही दस्ताऐवज असतात त्याचे जतन संवर्धन कसे केले पाहिजे याचे सामाजिक भान या समाजाभिमुख प्रकल्पातून निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

६)चेतना विद्या मंदिरातील मुलांचा बुध्दांक सर्वसामन्य बालकांपेक्षा वेगळा आहे. अशा या बालकांना शिकवणे आव्हानात्मक कसे आहे हे तिथे प्रत्यक्ष गेल्यानंतर समजून आले. या शाळेत गतीमंद मतीमंद मुले स्वमग्न असलेली दिसून आली. अशा मुलांमध्ये राहून शिक्षक त्यांना कसे शिकवतात त्यांना समजावून कसे घेतात. हेच आमच्या प्रशिक्षिणार्थीनी समजून घेऊन आपण ही अशाप्रकारे कार्य करावे हाच या समाजाभिमुख प्रकल्पाचा खरा उद्देश म्हणावा लागेल.

७)छ.शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये पारिजात नावाचे तीन महिण्यानंतर प्रकाशीत होणारे त्रैमासिक चालविले जाते. यामध्ये प्राचार्य, शिक्षक आणि छात्रअध्यापक यांनी मिळून संपादकीय व कार्यकारी संपादकीय मंडळ बनविलेले आहे. या अंकाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये तीन महिण्यामध्ये घडलेल्या घडामोडी जंयत्या पुण्यतिथ्या लेख वाढदिवस शैक्षणिक उपक्रमांच्या नोंदी कविता इत्यादी बाबींचा विचार या अंकामध्ये केला जातो आणि या अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कडे असणारी लेखन क्षमता विकसित केली जाते.

**<u>वैयक्तिक भुमिका</u>**

Scanned with OKEN Scanner

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## अनुभव


## विदयार्थ्यांच्या प्रतिक्रिया

इतर फोटो

बॉटेनिकल गार्डनमधील फोटो ऑरकीड चेतना विद्या मंदिर









ना. हातकणंगले,
जि. कोल्हापूर






शिक्षणशास्त्र विभाग

टाऊन हॉल, वस्तुसंग्रहालय





**प्राचार्य**
छ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय
रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner







Scanned with OKEN Scanner

डॉ. शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर





Scanned with OKEN Scanner

ता हातकणंगले,
जि कोल्हापूर







Scanned with OKEN Scanner








Scanned with OKEN Scanner

शिक्षणशास्त्र महाविद्यालय
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर




Scanned with OKEN Scanner


ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर






Scanned with OKEN Scanner

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर




vivo X200 FE | ZEISS

50mm f/2.0 1/100s ISO250
02/11/2026, 16:54




Scanned with OKEN Scanner